महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर

सेक्टर२७, मिहान पुनर्वसन वसाहत खापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)

e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in

"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2022/ 6688(D) दिनांक : 24 NOV 2022

**www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरण्याकरिता काही मार्गदर्शक सुचना — 1**

1) www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर सर्व विदयार्थ्यांनी नोंदणी झाल्यानंतर User ID व Password आपल्या ईमेलवर सुरक्षित करुन ठेवावा. आपणास दरवर्षी याच User ID व Password ने MahaDBT Portal वरती अर्ज सादर करावयाचा आहे.
2) विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना कागदपत्रे 26 kb साईजचे आत PDF/JPEJ Format मध्ये Scanner वर स्कॅन करून अपलोड करावे. (मोबाईल मधून डॉक्युमेंटस स्कॅन करु नये) अर्जाची ऑनलाईन पध्दतीने पडताळणी करण्यात येणार असल्याने विदयार्थ्यांनी स्पस्ट दिसणारे Documents Upload करावयाचे आहेत. Documents अस्पस्ट दिसल्यास सदर अर्ज पुन्हा विदयार्थ्यांच्या लॉगीन ला परत पाठविण्यात येईल.
3) प्रथम, व्दितीय, तृतीय, चतुर्थ व थेट व्दितीय वर्षाच्या विदयार्थ्यांनी Current Course Details मधील पुर्ण Information Delete करावी व Degree 1st, 2nd OR 1st, 2nd, 3rd OR 1st, 2nd, 3rd, 4th Year ची माहिती भरावी व Course Type — **Aided करावा.**
4) Past Information मध्ये प्रथम दहावी/बारावी/प्रथम, व्दितीय, तृतीय वर्षाची माहिती भरावी.
5) CAP ID Letter मध्ये Admission Incharge यांची सही असलेले व आपले फोटो असलेले Final Allotment Letter Upload करावे.
   - प्रथम, व्दितीय, तृतीय, चतुर्थ व थेट व्दितीय वर्षाच्या विदयार्थ्यांनी Fee Paid या Option मध्ये Government College of Engineering, Nagpur च्या Website वर Admission Fees पुर्ण फी भरली असल्यास पुर्ण फी टाकावी, Category ची Admission Fees भरली असल्यास शुन्य (ZERO) फी टाकावी. व Online Payment केलेली Receipt, Fee Receipt म्हणून MahaDBT Portal वर Upload करावे.
   - प्रथम, व्दितीय, तृतीय, चतुर्थ व थेट व्दितीय वर्षाच्या विदयार्थ्यांनी Cap ID Letter या Option मध्ये Admission Incharge यांची सही असलेले व आपले फोटो असलेले Final Allotment Letter Cap ID Letter म्हणून MahaDBT Portal वर Upload करावे.
6) विदयार्थ्यांचे अर्ज बरोबर असल्यास Application Approved by Desk — 1 व Desk -2 Officer व अपुर्ण किंवा चुकीचा अर्ज असल्यास Sent back to applicant अशा प्रकारचे SMS आधार लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर येतील.

7) अर्ज Sent back to applicant का केला आहे याचे कारण पाहण्यासाठी www.mahadbtmahait.gov.in

Post matric scholarship ⇒ Go to applicant log in ⇒ My applied scheme ⇒ Under Scrutiny Application

**Application ID वर Click करावे व Scrutiny Remark वाचून अर्जामध्ये योग्य ते बदल करावे व My applied scheme वर जाऊन ग्रीन कलरच्या Re-apply Button वर Click करावे. असे न केल्यास आपला अर्ज संस्थेच्या Log In मध्ये येणार नाही व अर्ज मंजूर होणार नाही.**

8) एखादया विदयार्थ्याने संपुर्ण अर्ज भरला आणि Scholarship Scheme करिता देखिल Apply केले असेल व त्यानंतर अर्जात काही बदल करावयाचे असतील तर आपल्या Log In मधून Scheme ला Cancel करावे. Scheme Cancel केल्यानंतर आपल्या Registered Mobile नंबर वर OTP येईल व अर्ज Cancel होईल व त्यानंतर Profile मध्ये योग्य ते बदल करावे व Scheme साठी Apply करावे.

9) विदयार्थ्याच्या ऑनलाईन अर्जामध्ये कुठलीही अडचण येत असल्यास आपल्या Log In मध्ये Grievance/Suggestion मध्ये Comments मध्ये आपल्या अडचणी टाकणे व त्याचा Reapply आपल्या ई-मेल वर किंवा आपल्या Log In मध्ये Grivience Dashboard नावाच्या Option मध्ये पहावा.

10) **विदयार्थ्यांनी स्वत:चा Permanent मोबाईल क्रमांक आपल्या आधारकार्ड मध्ये आधारकार्ड केंद्रातून लिंक करुन घेणे बंधनकारक आहे. व त्यानंतर आपले Indian Postal Payment Bank मध्ये खाते काढून घ्यावे. त्यामुळे आपली Scholarship Fund Disbursement मध्ये कोणतीही अडचण येणार नाही.**

11) सन 2018-19, 2019-20, 2020-21, 2021-22, 2022-23 या वर्षाची शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर झाली किंवा नाही हे पाहण्यासाठी My Applied Scheme History वर Click करावे.

- ज्या विदयार्थ्यांनी सन 2018-19, 2019-20, 2020-21, 2021-22 मध्ये MahaDBT Portal वर शिष्यवृत्तीचा ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला आहे. परंतु Scholarship/Freeship चा लाभ मिळाला नाही, विदयार्थ्यांचे बँक खाते NPCI Portal ला लिंक नसल्यामुळे त्यांना अदयापपर्यंत First Installment व Second Installment प्राप्त झाला नाही. व Notification/Clerk Redeem Status मध्ये Awaiting Approval/ Aadhar Number is not seeded in NPCI असे Status दाखवत असेल तर प्रथम पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

**Uidai.gov.in ⇒ My Aadhaar ⇒ In Aadhaar Services ⇒ Check Aadhaar/Bank Linking Status**

**बँकेला आधार लिंक नसेल व Scholarship/Freeship आली नसेल तर नजीकच्या Post Office मध्ये Indian Postal Payment Bank चे खाते काढावे.**

12) सर्व विदयार्थ्यांनी आपल्या अर्जाचे Online Status आपल्या Log in मधुन Check करत राहावे.

13) **2022-23 या शैक्षणिक वर्षात जे शिष्यवृत्ती/फ्रिशिपधारक विदयार्थी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरणार नाही अथवा ज्यांचे अर्ज Reject होतील अशा विदयार्थ्यांनी त्या वर्षाची संस्थेची शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणे बंधनकारक राहील. यास विदयार्थी स्वत:जबाबदार असेल.**

14) खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे Category व पालकाच्या उत्पन्नाप्रमाणे ऑनलाईन सादर करावा.

**Direct link to apply for scholarship/Freeship :- www.mahadbtmahait.gov.in**

| Sr. No. | Category | Department | Scheme | Income Limit |
|---|---|---|---|---|
| 1 | OPEN, SEBC, EWS | Directorate of Technical Education | Dr. Panjabrao Deshmukh Vastigruh Nirvah Bhatta Yojna (DTE) | Upto 8,00,000/- |
| 2 | OPEN, SEBC, EWS | | Rajarshi Chhatrapati Shahu MAhraj Shikshan Shulkh Shishyavrutti Yojna (EBC) | Upto 8,00,000/- |
| 3 | MUSLIM. SIKH, CHRISTEN, PARSI, JAIN, JEW, NAV BOUDHHA | Minority Development Department | Scholarship for students of minority communities pursuing Higher and Professional Courses (DTE) | Upto 8,00,000/- |
| 4 | OBC | OBC, SEBC, VJNT & SBC Welfare Department | Post Matric Scholarship to OBC Students | Upto 1,50,000/- |
| 5 | SBC | | Post Matric Scholarship to SBC Students | |
| 6 | VJNT | | Post Matric Scholarship to VJNT Students | |
| 7 | OBC | | Tuition Fees & Exam Fees to OBC Students | Upto 1,50,000/- To 8,00,000/- |
| 8 | SBC | | Tuition Fees & Exam Fees to SBC Students | |
| 9 | VJNT | | Tuition Fees & Exam Fees to VJNT Students | |
| 10 | SC | Social Justice and Special Assistance Department | Government of India Post Matric Scholarship | Upto 2,50,000/- |
| 11 | SC | | Post Matric Tuition Fee and Examination Fee (Freeship) | Above 2,50,000/- To Unlimited |
| 12 | ST | Tribal Development Department | Post Matric Scholarship Scheme (Government of India) | Upto 2,50,000/- |
| 13 | ST | | Tuition Fee and Examination Fee for Tribal Students (Freeship) | Above 2,50,000/- To Unlimited |

15) अर्जामध्ये Category नुसार अपलोड करावयाचे Declaration Certificate Minority करिता Annexure-1 आपल्या Log In मध्ये Downloads नावाच्या Option मध्ये जाऊन आपल्या Scheme नुसार Certificate Download करावे.

16) व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाच्या विदयार्थ्यांनी जर पुर्वी MahaDBT Portal Scholarship/Freeship साठी Apply केले असेल तर अशा विदयार्थिनी Renewal of Application करावे व Is this a renewal of application या Question ला YES करावे. मागच्या वर्षाच्या अर्जाचा 17 अंकी Application ID टाकावा. उदा. 2122VJO100682789

17) **ST/SC हे प्रवर्ग वगळुन इतर सर्व प्रवर्गातील ज्या विदयार्थ्यांच्या पालकाची उत्पन्न मर्यादा 8 लाख पेक्षा जास्त असेल त्यांना कुळल्याही योजनेचा लाभ घेता येणार नाही तसेच संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षास पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**

18) **TFWS मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजने व्यतिरीक्त अन्य कुठलाही लाभ घेता येणार नाही. अन्य सवलतीस Apply केल्यास अर्ज रदद करण्यात येईल, तसेच रक्कम अदा झाल्यास वसुल करण्यात येईल.**

19) **Against CAP (EWS) मधुन प्रवेशित विदयार्थ्यांना कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.**

20) **Against CAP (ST/SC) मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**

21) **Against CAP (OBC/SBC/VJNT) मधुन प्रवेशित विदयार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिपचा अर्ज भरायचा आहे. परंतु शिष्यवृत्ती/फ्रिशिप मंजूर न झाल्यास संबंधित विदयार्थ्यास प्रत्येक वर्षाची पुर्ण फी भरणे अनिवार्य राहील. याची विदयार्थ्यांनी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.**

22) सर्व विदयार्थिनी अर्ज भरण्याची अंतिम तारीख पुन्हा-पुन्हा विदयार्थी विभागात येऊन तसेच विदयार्थी विभागातील कर्मचारी, HOD, Professor यांना वेळो/अवेळी फोन करुन विचारु नये/ पुन्हा-पुन्हा Whatsapp messages करु नये. माहिती व चौकशीकरीता विदयार्थी विभागातील 8468903473 हा मोबाईल नंबर उपलब्ध करुन देण्यात आलेले असून कार्यालयीन वेळेत सदर नंबरवर संपर्क करावा. तसेच वेळोवेळी विदयार्थी विभागामार्फत Updated notices विदयार्थी विभागाचे व आपल्या विभागाच्या सूचनाफलकावर लावल्या जातात. तसेच आपल्या Class च्या Whatsapp Group वरती पाठवल्या जातात, त्या काळजीपुर्वक वाचाव्यात आपणांस मराठी भाषा समजण्यामध्ये अडचण असेल तर इतर विदर्यार्थी किंवा घरातील वरिष्ठांकडून नोटीस समजावून घ्यावी. तसेच Cyber Café मध्ये ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता काही अडचणी असतील तर त्यांना संस्थेची सूचना दाखवावी. तसेच www.mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर पोस्टमॅट्रीक स्कॉलरशिप वर Click करुन User Manuals वाचावे तसेच Help Video बघावे.

जोपर्यंत आपणास ऑनलाईन अर्ज भरता येईल तोपर्यंत विदयार्थ्यांनी अर्ज भरावयाचा आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारिख www.mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर शासनमार्फत वेळोवळी Display करण्यात येते. परंतू अंतिम तारखेची वाट न पाहता विहीत वेळेत विदयार्थ्यांनी अर्ज भरावा. जेणेकरुन आपले आर्थिक नुकसान होणार नाही याची विदयार्थी व पालकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

(प्रा. पी. व्ही.नंदनकर)
नोडल अधिकारी शिष्यवृत्ती,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयायल,
नागपुर

(डॉ. रेवतकुमार बोरकर)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयायल,
नागपुर

प्रत : 1) सर्व प्रवेशित विदयार्थी, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता, देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

2) प्रोग्रामर, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना महाविदयालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.

3) विदयार्थी विभाग, सुचना फलक शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर.

4) सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची सुचना विभागाच्या सुचना फलकावर लावून तसेच विभागाच्या Whatsapp Group व्दारे आपल्या विभागातील विदयार्थ्यांना निदर्शनास आणून दयाव्यात.